Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ८ ] गुरुवार ते बुधवार, मार्च २४-३०, २०२२/चैत्र ३-९, शके १९४४ [ पृष्ठे ६, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १६-३-२०२२.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**अधिसूचना**

क्रमांक टीपीएस-२८२२-८३०-प्र.क्र. ०९-२०२२-नवि-३०.—

ज्याअर्थी, अमरावती शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे.) चे कलम ३१ अन्वये, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२८९२-११८०-प्र.क्र.९०-९२ (बी)-नवि-१३, दिनांक ४ डिसेंबर, १९९२ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक २५ फेब्रुवारी, १९९३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे रहाटगांव, ता. जि. अमरावती येथील स. क्र. १९४/१ मधील २.८४ हे. आर या जमिनीपैकी २ हे. आर (यापुढे " उक्त जमीन " असे संबोधले आहे.) क्षेत्र उक्त विकास योजनेनुसार आ.क्र.५१५ ए-" प्राथमिक शाळा " (बाधित क्षेत्र ०.१९ हे. आर), आ. क्र. ५१५ बी- " माध्यमिक शाळा " (बाधित क्षेत्र ०.०.२९ हे. आर) आणि आ. क्र. ५१५ सी-" खेळाचे मैदान " (बाधित क्षेत्र १.५२ हे. आर) या आरक्षणाने बाधित आहे (यापुढे " उक्त विकास योजनेनुसारची आरक्षणे " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेनुसारच्या आरक्षणांचे समुचित प्राधिकरण अमरावती, महानगरपालिका आहे. (यापुढे " उक्त समुचित प्राधिकरण " असा उल्लेख केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त विकास योजनेनुसारच्या आरक्षणांनी बाधित उक्त जमीन उक्त विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या आत संपादित केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीच्या जमिन मालकांनी उक्त विकास योजना आरक्षणांबाबत उक्त समुचित प्राधिकरणावर उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) अन्वये दिनांक ११-०५-२०१५ रोजी सूचना बजावली (यापुढे " उक्त सूचना " असा उल्लेख केला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त सूचना बजावून देखील उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत, उक्त जमीन संपादन केली नाही अथवा ती संपादन करण्यासंबंधिची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६(४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची भूसंपादनाची अधिसूचना विहित मुदतीत प्रसिद्ध केली नाही ;

आणि ज्याअर्थी, अमरावती शहराची प्रारूप (दुसरी सुधारित) विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) चे कलम २६ अन्वये, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ६-१२ डिसेंबर २०१८ मध्ये प्रसिद्ध झाली (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असा उल्लेख केला आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेनुसार उक्त जमीन आ. क्र. ९ " खेळाचे मैदान " आणि आ. क्र. १० " सार्वजनिक सुविधा " या आरक्षणांनी बाधित आहे (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना आरक्षणे " असा उल्लेख केला आहे) ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाने, उक्त जमिनीच्या मालकांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ६२९७/२०१९ मध्ये दिनांक १३-१०-२०२१ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये उक्त जमिनीवरील उक्त विकास योजनेतील उक्त विकास योजना आरक्षणे आणि उक्त प्रारूप विकास योजना आरक्षणे व्यपगत ठरली असून त्यानुषंगाने उक्त विकास योजना आरक्षणे आणि उक्त प्रारूप विकास योजना आरक्षणे उक्त जमिनीवरून व्यपगत झाल्याबाबतची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(२) अन्वयेची अधिसूचना निर्गमित करण्याबाबत शासनास आदेशित केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर तसेच अमरावती, महानगरपालिका आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अहवाल विचारात घेता असे दिसून येते की, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वये उक्त सूचना बजावल्यापासून, उक्त समुचित प्राधिकरणाने विहित कालावधीत उक्त जमिनीवरील उक्त विकास योजना आरक्षणांनी बाधित क्षेत्राच्या जमिनीचे संपादन केले नाही अथवा सदर बाधित क्षेत्राच्या जमिनीचे संपादन करण्यासंबधिची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६(४) सह भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ ची भूसंपादनाची अधिसूचना विहित मुदतीत प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे या परिस्थितीत उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) मधील तरतुदीनुसार मौजे रहाटगांव, ता. जि. अमरावती येथील स. क्र. १९४/1 मधील आ. क्र. ५१4 ए-" प्राथमिक शाळा " (बाधित क्षेत्र ०.१९ हे. आर), आ. क्र. ५१५ बी-" माध्यमिक शाळा " (बाधित क्षेत्र ०.०.२९ हे. आर), आणि आ. क्र. ५१५ सी " खेळाचे मैदान " (बाधित क्षेत्र १.५२ हे. आर) या बाधित क्षेत्रावरील आरक्षणे व्यपगत झाली असल्याचे शासनाचे मत झाले आहे ;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) नुसार प्राप्त अधिकारात राज्य शासन अमरावती, महानगरपालिकेच्या उक्त विकास योजनेतील उक्त विकास योजनेनुसारची आरक्षणे खालील परिशिष्टात नमूद क्षेत्रापुरती व्यपगत झाल्याचे अधिसूचित करीत आहे, व अशाप्रकारे आरक्षणातून मुक्त झालेली जमीन संबंधित जमीन मालकास उक्त विकास योजनेतील लगतच्या अनुज्ञेय भूवापराप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या विकासाकरीता उपलब्ध होईल ;

**परिशिष्ट**

| अ. क्र. | जमिनीचा तपशील | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचा तपशील | आरक्षणाचे एकूण क्षेत्र | कलम १२७(१) अन्वये आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हे. आर | हे. आर |
| १ | मौजे रहाटगाव, स. क्र. १९४/1 पै. | ५१५ ए | प्राथमिक शाळा | ० ४८ | ० १९ |
| २ | मौजे रहाटगाव, स. क्र. १९४/1 पै. | ५१५ बी | माध्यमिक शाळा | ० ८० | ० २९ |
| ३ | मौजे रहाटगाव, स. क्र. १९४/1 पै. | ५१५ सी | खेळाचे मैदान | २ ०० | १ ५२ |

उक्त विकास योजनेतील उक्त परिशिष्टातील रकाना क्र. (६) मध्ये नमूद क्षेत्रापुरती आरक्षणे उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) अन्वये व्यपगत झाली असल्याने त्याच क्षेत्रावरील अमरावती शहराच्या उक्त प्रारूप विकास योजनेतील आ. क्र. ९ " खेळाचे मैदान " आणि आ. क्र. १० " सार्वजनिक सुविधा " ही आरक्षणे निष्प्रभ ठरली आहेत.

प्रस्तुत आदेशान्वये उक्त आरक्षणांमधून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात आली आहे.

सदरचे आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** (कायदे/नियम) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**वीणा मोरे,**
अवर सचिव.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 16-03-2022.

THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*NOTIFICATION*

No. TPS-2822-830-CR-09-2022-UD-30.—

Whereas, the Revised Development Plan of Amravati City, District Amravati has been sanctioned by the Government under Section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS 2892-1180-CR-90-92(B)-UD-13, dated 4th December, 1992 and has come into force with effect from the 25th February, 1993 (hereinafter referred to as " the said Development Plan ") ;

And whereas, in the said Development Plan, the land bearing S. No. 194/1 of Mouje Rahatgaon is affected by the Reservation No. 515 A " Primary School " (affected area 0.19 H. A.), Reservation No. 515 B " Secondary School " (affected area 0.29 H. A.), Reservation No. 515 C " Play Ground " (affected area 1.52 H. A.) (hereinafter referred to as " the said land ") (hereinafter referred to as " the said Development Plan Reservations ") ;

And whereas, the Appropriate Authority for the said Development Plan reservations is Amravati Municipal Corporation (hereinafter referred to as " the said Appropriate Authority ") ;

And whereas, the said land affected by the said Development Plan reservations, has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force ;

And whereas, land owners of the said land have served Notice dated 11-05-2015 under Section 127(*1*) of the said Act, on the said Appropriate Authority (hereinafter referred to as " the said Notice ") ;

And whereas, even after service of the said Notice as aforesaid, the said land had neither been acquired, nor the Notification of land acquisition required under Section 126 (*4*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, has been published by the said Appropriate Authority, within prescribed time period from the date of the service of said Notice under sub-section (*1*) of Section 127 of the said Act ;

And whereas, the Draft (Second Revised) Development Plan of Amravati City, District Amravati has been published under Section 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) in the *Official Gazette* dated 6-12/12-2018 (hereinafter referred to as " the said draft development plan ") ;

And whereas, in the said Draft Development Plan, the said land is affected by the Reservation No. 9 " Play Ground " and Reservation No. 10 " Public Amenities " (hereinafter referred to as " the said draft development plan reservations ") ;

And whereas, the Hon'ble High Court, Nagpur Bench, in Writ Petition No. 6297 of 2019 filed by the owners of the said land, *vide* its Order, dated 13-10-2021, has held that the said Development Plan reservations and the said Draft Development Plan reservations, on the said land stand lapsed and directed the State of Maharashtra to notify the lapsing of the said reservations on the said land under Section 127(*2*) of the said Act ;

And whereas, after receiving the Hon'ble High Court Order and the Report of the Amravati Municipal Corporation and the Report of the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, it is observed that the said land affected by

the said Development Plan Reservations, had neither been acquired within the prescribed time limit from the date of service of the said Notice, nor Notification of land acquisition required under Section 126 (*4*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 read with Section 19 of the Right to Fair Compensation of Transparency in Land Acquisition, Rehabilitation & Resettlement Act, 2013, been published within the prescribed time limit by the said Appropriate Authority. And, in consequence thereof, the Government of Maharashtra is of opinion that the Reservation No. 515 A " Primary School " (affected area 0.19 H. A.), Reservation No. 515 B " Secondary School " (affected area 0.29 H. A.), Reservation No. 515 C " Play Ground " (affected area 1.52 H. A.) on the land bearing S. No. 194/1 of Mouje Rahatgaon stand lapsed as per the provisions of Section 127 (*1*) of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby notifies that the said Development Plan reservations in the said Development Plan of Amravati City stand lapsed to the extent of the area as mentioned in the Annexure below and the land so released, will be available to the owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent land under the said Development Plan.

ANNEXURE

| Sr. No. | Land details | Reservation No. | Name of the reservation | Total area of the reservation | Area lapsed under Section 127(*1*) |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | H. A. | H. A. |
| 1 | Village Rahatgaon, S. No. 194/1 (p) | 515 A | Primary School | 0 48 | 0 19 |
| 2 | Village Rahatgaon, S. No. 194/1 (p) | 515 B | Secondary School | 0 80 | 0 29 |
| 3 | Village Rahatgaon, S. No. 194/1 (p) | 515 C | Play ground | 2 00 | 1 52 |

And whereas, as the reservations of the said Development Plan have lapsed to the extent of the area mentioned in the column (6) of the Annexure above, the Reservation No. 9 " Play Ground " and Reservation No. 10 "Public Amenity " shown in the said Draft Development Plan have become " Null and Void " to that extent.

A copy of the Part Plan, showing the area of the said Reservations which have been lapsed *vide* this Order, is available in the office of the Municipal Commissioner, Amravati Municipal Corporation, District Amravati during office hours on all working days for inspection of public for the period of one month.

This Order shall also be published on the Govt. website *www.maharashtra.gov.in (Acts/Rules)*

By Order and in the name of the Governor of Maharashtra,

VEENA MORE,
Under Secretary.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३४.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये शेगाव शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण

क्रमांक-वि.यो.शेगाव-दु.सु.वा.ह-कलम २६(१) प्रसिद्धी-नरवि-नपाशे-२९३-२०२२.—

ज्याअर्थी, शेगाव नगर परिषदेने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेले) तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली) चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना शेगाव (दु.सु.वा.ह.) (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ३, दिनांक १० डिसेंबर २०१९ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र अमरावती विभाग पुरवणी भाग १-अ मध्ये दिनांक जानेवारी १६-२२ सन २०२० रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून शेगाव नगर परिषदने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, बुलडाणा यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. ५२४/२०२०, दिनांक २२ जून २०२० अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना शाखा, बुलडाणा यांनी उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाश तयार केल्यांनतर उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. १, दिनांक ०७ मार्च २०२२ रोजी पारीत केला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबधिचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, शेगाव नगर परिषद, शेगाव.

२. सहायक संचालक, नगर रचना शाखा, बुलडाणा.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, शेगाव यांचेकडे लेखी स्वरूपात कारणासह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत नगर परिषदकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून शेगाव नगर परिषद कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

**प्रशांत शेळके,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, शेगाव.

शेगाव :
दिनांक १० मार्च २०२२.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३५.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Publication of Draft Development Plan of Shegaon Under Section 26(*1*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

No. Devplan Shegaon-S.R+E.L-Sec 26(1) Publish-TP-M.C.S-293-2022.—

Whereas, the Shegaon Municipal Council (hereinafter referred to the "said Planning Authority,") *vide* Resolution No. 3, dated 10th December 2019 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Shegaon (S.R+E.L) (hereinafter referred to as the " said Draft Development Plan ") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the " said area ") as per the provision of Section 23(*1*) read with Section 21 (*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the " said Act ") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division, Supplement Part 1-A on dated January 16-22, Year 2020.

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Municipal Council *vide* Order No. 524/2020, dated 22nd June 2020 has appointed Assistant Director, Buldhana Branch as " Town Planning Officer " to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning Buldhana Branch after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on for publication under Section 26(*1*) of the said Act ;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 1, dated 7th March 2022 to publish the said Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act. For inviting suggestions/objections from the public ;

Therefore, Shegaon, Municipal Council hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Chief Officer, Shegaon, Municipal Council.
2. Assistant Director, Town Planning Branch, Buldhana.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons. Shall be submitted to the Chief Officer, Shegaon, Municipal Council within the period of 30 days from the date of publication of the notice in *Maharashtra Govt. Gazette* suggestions/objections received by the Municipal Council within the period of 30 days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Shegaon, Municipal Council.

PRASHANT SHELKE,
Chief Officer,
Municipal Council, Shegaon.

Shegaon :
Dated the 10th March 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.